# ग्रामपंचायत सोरतापवाडी तालुका हवेली जिल्हा पुणे

## मुद्दा क्र. १

## ग्रामपंचायत सोरतापवाडी कार्यकारणी

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | प्रवर्ग | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | सौ.सुनिता कारभारी चौधरी | सर्वसाधारण स्त्री | सरपंच |
| २ | २ | श्री.विलास शंकर चौधरी | सर्वसाधारण पुरुष | उपसरपंच |
| ३ | १ | श्री. रविंद्र मोहन गायकवाड | नागरीकांचा  मागास प्रवर्ग पुरुष | सदस्य |
| ४ | १ | श्री.शंकर ज्ञानोबा कड | सर्वसाधारण पुरुष | सदस्य |
| ५ | १ | सौ.सुप्रिया देवेंद्र चौधरी | सर्वसाधारण स्त्री | सदस्य |
| ६ | २ | सौ. स्नेहल विठ्ठल चौधरी | नागरीकांचा  मागास प्रवर्ग स्त्री | सदस्य |
| ७ | ३ | श्री. निलेश विठ्ठल खटाटे | सर्वसाधारण पुरुष | सदस्य |
| ८ | ३ | सौ.अश्विनी चंद्रकांत शेलार | अनुसुचित जाती स्त्री | सदस्य |
| ९ | ३ | सौ. पुनम नवनाथ आढाव | सर्वसाधारण स्त्री | सदस्य |
| १० | ४ | सौ.सोनाली नागनाथ लोंढे | अनुसुचित जाती स्त्री | सदस्य |
| ११ | ४ | सौ.मनिषा नवनाथ चौधरी | सर्वसाधारण स्त्री | सदस्य |
| १२ | ४ | श्री.विजय सर्जेराव चौधरी | सर्वसाधारण पुरुष | सदस्य |
| १३ | ५ | श्री.शशीकांत दशरथ भालेराव | अनुसुचित जाती पुरुष | सदस्य |
| १४ | ५ | श्री.सुरज पोपट चौधरी | सर्वसाधारण पुरुष | सदस्य |
| १५ | ५ | सौ.संध्या अमित चौधरी | सर्वसाधारण स्त्री | सदस्य |

**ग्रामपंचायत सोरतापवाडी**

**ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२**

**मुद्दाक्र. १**

ग्रामपंचायतीसखालील अनुसुची १ मध्ये उल्लेख केलेल्या विषयांवर कार्य करता येते.

१) जमिनी आणि गावातील इतर साधनसंपत्ती यांची सहकारी व्यवस्थापनासाठी व्यवस्था करणे, सामुदायिक सहकारी शेतीची संघटना.

२) शेतीची सुधारणा आणि आदर्श कृषिक्षेत्रांची स्थापना.

३) शासनाने पंचायतीकडे निहित केलेल्या पडीत आणि ओसाड जमिनी लागवडीखाली आणणे.

४) पडीत जमिनीचे पुनः प्रापण आणि राज्य सरकारच्या पूर्वपरवानगीने पडीत जमीन लागवडीखाली आणणे

५) सुधारलेल्या बी-बियाण्यांचे उत्पादन करण्याकरिता रोपळयांची स्थापना करणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे आणि सुधारलेल्या बी-वियाण्यांच्या उपयोगास उत्तेजन देणे.

६) पिकासंबंधी प्रयोग,

७) पीक संरक्षण,

८)खतांची साधनसंपत्ती सुरक्षित ठेवणे, मिश्रखत तयार करणे आणि खतांची विक्री करणे.

९) कृषि उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने गावामध्ये लागवडीचे किमान प्रमाण ठरवणे.

१०) जमीन सुधारणा योजना कार्यान्वित करण्यास साहाय्य करणे,

११) धान्यागारांची स्थापना करणे.

१२) गुरांची आणि त्यांच्या पैदाशीची सुधारणा करणे आणि पशुधनाची सर्व सामान्य काळजी घेणे.

१३) ग्राम वन आणि गायराने वाढवणे, त्यांचे **जतन** करणे, त्यात सुधारणा करणे आणि त्यांच्या उपयोगाचे नियमन करणे.

१४) अपंग, निराश्रित आणि आजारी असलेल्यांना सहाय्य देणे.

१५) गावाचे सामाजिक व नैतिक कल्याण यांची वाढ करणे.

१६) महिलांच्या आणि मुलांच्या संघटना आणि त्यांचे कल्याण.

१७) शिक्षणाचा प्रसार करणे,

१८) **इतर** शैक्षणिक व सांस्कृतिक उद्देश.

१८-अ [त्या त्या वेळी जिल्हा परिषदेकडे निहित असलेल्या प्राथमिक शाळांच्या इमारतीची व्यवस्था ठेवणे व दुरूस्ती करणे.]

१९) शाळांकरता सामग्री आणि क्रीडांगणे यांची तरतूद करणे.

२०) प्रौढ साक्षरता केंद्रे, ग्रंथालये व वाचनालये.

२१) ग्रामीण विमा.

२२) वैद्यकीय मदतीची तरतूद करणे.

२३) प्रसूती आणि शिशु कल्याण.

२४) आरोग्य रक्षण व सुधारणा.

२५) कोणत्याही संक्रमक रोगाचा उद्रेक, फफैलाव किंवा पुनरूद्भव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे.

२६) माणसांना आणि प्राण्यांना देवीप्रतिबंधक लस टोचण्यास उत्तेजन देणे.

२७) चहा, कॉफी आणि दुधाच्या दुकानांचे लायसन्सद्वारे किंवा अन्यथा नियमन करणे.

२८) कतलखाने बांधणे, सुस्थितीत ठेवणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे.

२९) सार्वजनिक रस्ते, गटारे, बांध, (जलसिंचनासाठी वापरण्यात येणारी तळी व विहिरी सोडून) तळी व विहरी आणि इतर सार्वजनिक जागा किंवा बांधकामे स्वच्छ करणें.

३०) आरोग्यविघातक वस्त्यांची सुधारणा करणे.

३१) केरकचरा, माजलेले रान, काटेरी निवडुंकाढून टाकणे, वापरात नसलेल्या विहिरी, आरोग्यास अपायकारक तळी, डबकी, खंदक, खड्डे, खाचखळगे भरून काढणे, पाटबंधाऱ्यांच्या क्षेत्रात पाणी साचण्यास प्रतिबंध करणे आणि इतर आरोग्य रक्षणविषयक सुधारणा करणे.

३२) सार्वजनिक शौचकूप बांधणे व ते सुस्थितीत राखणे,

३३) स्वच्छता, साफसफाई, उपद्रव होऊ न देणे व तो कमी करणे व बेवारशी प्रेतांची व मेलेल्या जनावरांच्या सांगाड्यांची विल्हेवाट लावणे,

३४) घरगुती उपयोगासाठी व जनावरांसाठी पाण्याचा पुरवठा करणे.

३५) गुरांना पाणीपुरवठा करण्याकरिता तळी खणणे, ती स्वच्छ करणे व सुस्थितीत राखणे.

३६) ज्यांची कोणत्याही प्राधिकरणाकडून व्यवस्था ठेवण्यात येत नसेल अशा स्नानाच्या व धुण्याच्या घाटांची व्यवस्था ठेवणे व त्यांवर नियंत्रण ठेवणे.

३७) दहनभूमी व दफनभूमी यांची तरतूद करणे, त्या सुस्थितीत राखणे व त्यांचे नियमन करणे.

३८) सार्वजनिक इमारती, पंचायतीमध्ये निहित असलेली किंवा पंचायतीच्या नियंत्रणाखाली असलेली (जलसिंबनासाठी वापरण्यात येत असलेली तळी व विहिरी यांच्या व्यतिरिक्त इतर ) तळी व विहिरी सुस्थितीत राखणे व त्यांच्या उपयोगाचे नियमन करणे.

३९) सार्वजनिक रस्ते किंवा जागा व खाजगी मालमत्ता सर्व लोकपरासी मुभा असेल अशा जागायातील अडगळे व पुढे आलेले भाग काढून टाकणे.

४०) सार्वजनिक रस्ते, गटारे, बांध व पूल बांधणे, सुस्थितीत राखणे व दुरुस्त करणे:परत, असे रस्ते, गटारे, बांध व पूल **इतर** कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असतील, तर त्या प्राधिकरणाच्या संमतीवाचून अशी कामे हाती घेतली जाणार नाही.

४१) रस्त्याच्या बाजूस, बजार जागांत व तसेच इतर सार्वजनिक जागांत झाडे लावणे, त्यांची जोपासना व रक्षण करणे.

४२) क्रीडांगणे, सार्वजनिक उपवने व तळ देण्यासाठी जागेची तरतूद करणे व ती सुस्थितीत राखणे,

४३) धर्मशाळा बांधणे व त्या सुस्थितीत राखणे,

४३- अ. भूमिहीमजूर आण अनुसूचित्माती, अनसूचिमाती, निराधिसूजितीत(Denotified) भटक्या जाती आणि इतर मागासवर्ग यातील व्यक्ती यांच्यासाठी झोपड्या आणि घरे बांधणे.]

४४) गावठाणांचा विस्तार आणि विहित करण्यात येतील अशा तत्वांनुसार इमारतीचे नियमन करणे. ४५) गावात दिवाबत्ती करणे,

४६) लहान पाटबंधारे.

(४६-अ) सर्व प्रकारच्या पाणीपुरवठा सुविधा, स्रोत, योजना संबंधीची निश्चिती, नियोजनसंकल्पन, बांधकाम, अंमलबजावणी, कार्यान्वयन, देखभाल व दुरूस्ती, फेर बांधकाम, व्यवस्थापन व इतर आनुषंगिक सर्व बाबी.

४६-ब) ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व पाण्याच्या उद्भवांचा एकात्मिक विकास, व्यवस्थापन आणि नियमन. ]

४७) कुटीर उद्योग व ग्रामोद्योग यांचे संवर्धन करणे, त्यांच्या सुधारणा करणे व त्यांना उत्तेजन देणे.

४८) पतसंस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्थांची संघटना करणे.

४९) सहकारी शेतीचे संवर्धन करणे.

५०) गावात राखण व पहारा ठेवणे :

परत राखण व पहाऱ्यासाठी होणारा खर्च विहित करण्यात येईल अशा गावातील व्यक्तीवर व अश्शा रीतीने पंचायत आकारील व तो त्यांच्याकडून वसूल करील.

५१) ग्रामस्वयंसेवक दल आणि संरक्षक कामगार बँक

५२) आगी विझविण्यास साहाय्य देणे व आग लागली असता जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करणे,

५३) उपद्रवकारक किंवा धोकादायक व्यवसाय किंवा व्यापार यांचे नियमन करणे, त्यांस आळा घालणे किंवा त्यांचे उपशमन करणे.

५४) पंचायतीचे अभिलेख तयार करणे, सुस्थितीत ठेवणे व त्यांची निगा ठेवणे.

५५) जागांना क्रमांक देणे,

५६) सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे या संबंधात विहित करील अशा रीतीने व अशा नमुन्यात विवाह यांची नोंद ठेवणे.

५७) कलम १६९ अन्वये "जेव्हा राज्य सरकारने सोपवले असेल तेव्हा जमीन महसूल वसूल करणे.

५८) जमीन महसुलासंबंधीच्या कोणत्याही विधिअन्वये वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा **रीतीने** आणि नमुन्यात जमीन महसुलासंबंधी गावाचे अभिलेख सुस्थितीत ठेवणे.

५९) ग्रामविकासासाठी योजना तयार करणे.

६०) गावातील कृषी उत्पादन व कृषितर उत्पादन वाढविण्यासाठी कार्यक्रम आखणे.

६१) ग्राम विकास योजना अमलात आणण्याकरता आवश्यक असलेला पुरवठा व वित्तव्यवस्था दर्शविणारी विवरणपत्रे तयार करणे.

६२) कोंडवाडे स्थापन करणे, त्यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांची व्यवस्था पाहणे.

६३) भटक्या व बेवारशी कुत्र्यांचा आणि डुकरांचा नाश करणे.

६४) बेवारशी गुरांची विल्हेवाट लावणे.

६५) पंचायतीच्या साफसफाई करणाऱ्या सेवकवर्गासाठी घरे बांधणे व ती सुस्थितीत राखणे.

६६) गावातील ज्या तक्रारी पंचायतीकडून दूर करण्याजोग्या नसतील त्या योग्य प्राधिकाऱ्यांना कळवणे.
६७) भुमापन करणे.

६८) कोणत्याही प्रयोजनासाठी केंद्र सरकारने किंवा राज्य सरकारने दिलेले साहाय्य ज्याच्या द्वारा गावापर्यंत पोहोचू शकेल असे माध्यम म्हणून कार्य करणे.

६९) जत्रा, यात्रा व उत्सव सुरू करणे, चालू ठेवणे व त्यांचे नियमन करणे,

७०) बाजार स्थापन करणे व ते सुस्थितीत राखणे, परंतु जिल्हा परिषदेची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय बाजारस्थापन करता कामा नये.

७१) जत्रा, बाजार, टांगातळ व गाडीतळ यांवर नियंत्रण ठेवणे.

७२) बखारी स्थापन करणे व त्या सुस्थितीत राखणे.

७३) टंचाईच्या काळात कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे किंवा लोकांना रोजगार पुरवणे.

[७३- अ. पंचायतीने हाती घेतलेल्या किंवा स्वीकारलेल्या किंवा पंचायतीकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही रोजगार

हमी योजनेखालील शारीरिक श्रमाचे काम शोधणाऱ्या गरजू स्थानिक लोकांना रोजगार पुरवणे.]

७४) बेकारीबाबत आकडेवारी तयार करणे.

७५) कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली असता रहिवाशांना साहाय्य देणे.

७६) सामुदायिक कामांसाठी आणि ग्रामोद्धाराच्या कार्यासाठी श्रमदानाची कामे आयोजिकरणे.
७७) रास्त भावाची दुकाने उघडणे.

७८) जनावरे थांबण्याच्या जागा, खळी, गायराने व सामुदायिक जमिनी यांवर नियंत्रण ठेवणे.

७९) आवश्यक असेलतेथेतेथे, डाक व तार विभागास ना-परतावा अंशदान देण्याचीतरतुद करुन गावातील प्रायोगिक डाकघरांच्या डाक सवलती मिळवणे.

## ग्रामपंचायत सोरतापवाडी

## ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

## मुद्दाक्र. १

ग्रामपंचायतीची कार्य व कर्तव्य

१) जिल्हा परिषदेच्या व पंचायतसमितीच्या सामान्य नियंत्रणाच्या अधीन, पंचायतीच्या स्वाधीन असलेल्या ग्रामनिधीतून करता येईल तेथवर गावात अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या विषयांपैकी सर्व किंवा कोणत्याही विषयः बाबत वजावतरत करणे. "[त्याचप्रमाणे, जेव्हा पंचायतीच्या विनंतीवरून जिल्हा परिषद किंवा राज्य शासन, आपल्या एजन्सीमार्फत, नळाने पाणीपुरवठा करण्याची कोणतीही योजना (बांधकामासह) हाती घेईल व पूर्ण करील तेव्हा अशी पाणीपुरवठा परियोजना आपल्याकडे स्वीकारणे व कलम १३२ (ब) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या पाणीपुरवठा निधीमधूनतिची देखभाल करणे हेही पंचायतीचे कर्तव्य असेल, मग ती योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या आणि मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अिधिनयम, १९८१ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी पूर्ण झालेली असो किंवा त्यानंतर पूर्ण झालेली असो. अशा कोणत्याही योजना पूर्ण झाल्या व उक्त तारखेपूर्वी पंचायतीने त्या ताब्यात घेतल्या नाहीत, तर पंचायत उक्त तारखेपासून तीस दिवसांत त्या ताब्यात घेईल, ही मुदत म्हणजे अशा योजनांकरिता विनिर्दिष्ट मुदत असेल आणि अशा कोणत्याही योजना, उक्त तारखेनंतर पूर्ण झाल्या, तर पंचायत त्या जिल्हा परिषद किंवा यथास्थिती राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत ताब्यात घेईल.]

२) राज्य सरकारला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अनुसूची १ मधील कोणतीही नोंद वगळता येईल किंवा तीत कोणत्याही नोंदीची भर घालता येईल किंवा अशी कोणतीही नोंद दुरूस्त करता येईल, आिण अशी अिधसूचना काढण्यात आल्यानंतर अशी अनुसूची त्यानुसार दुरूस्त करण्यात आली आहे असे मानले जाईल :

परत, अ) अनुसूची १ मधून कोणतीही नोंद वगळण्याबाबतची अशी कोणतीही अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय काढता येणार नाही; आण

ब) कोणतीही इतर अिधसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवली पाहिजे आणि ज्या अधिवेशनात ती अशा रीतीने

ठेवण्यात आली असेल त्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ तीत **जे** फेरबदल करील व शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील अशा फेरबदलास ती अधीन असेल. २-अ) पंचायतीस, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या पूर्वमंजुरीने, अनुसूची १ मध्ये विनिर्दिष्टकेलेल्या स्वरूपाचे कोणतेही काम गावाबाहेर पार पाडण्यासाठीसुद्धा तरतूद करता येईल; आणि राज्य सरकारने त्याबाबतीत दिलेल्या कोणत्याही निदेशांना अधीन राहून, गावाबाहेर राज्यसरकारने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही योजनेच्या बाबतीत किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी खर्च करता येईल.

२ब) पंचायतीस, ठराव करून, व विहित मर्यादांस अधीन राहून त्या अनुसूचीच्या नोंदी १७, १८, १९, २०, २२, व २३ याखाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात (गावात किंवावाबाहेर, परंतु पंचायत ज्यामध्ये काम करीत असेल त्या महसुली तालुक्याच्या हद्दीबाहेर नसेल अशा) कोणत्याही संस्थेला सहायक अनुदान देता येईल; परंतु अशी संस्था गावाच्या गरजांची पूर्तता करीत असली पाहिजे आणि उक्त अनुसूचीच्या नोंद २३ खाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीला असे अनुदान देता येईल; किंवा त्या अनुसूचीच्या नोंद ७५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी सरकारने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही निधीला अंशदान देता येईल. अशी संस्था गावाच्या गरजांची पूर्तता करते किंवा नाही किंवा असा निधी शासनाने पुरस्कृत केलेला आहे किंवा नाही याबाबत कोणतीही शंका निर्माण झाल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून त्या प्रश्नाचा निर्णय केला जाईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल :

परत असे सहायक अनुदान हे, राज्य सरकारने किंवा जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने पंचायतीला दिलेल्या कोणत्याही अनुदानामधून देता येणार नाही.)

३) पंचायतीस गावातील रहिवाशांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, सुखसोयी, सोयी किंवा सामाजिक किंवा आर्थिक

किंवा सांस्कृतिक कल्याण यांची ज्यायोगे वाढ होऊ शकेल असे इतर कोणतेही काम किंवा योजना गावात पार पाडण्याचीही तरतूद करता येईल.

४) पंचायतीस, ज्या ठरावाला तिच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा असेल असा ठराव आपल्या सभेत संमत करून, गावातील कोणताही सार्वजनिक सत्कार, समरमा किंवा करमणुकीचा कार्यक्रम याविषयी तरतूद करता येईल किंवा जिल्ह्यातील अथवा राज्यातील पंचायतींच्या वार्षिक संमेलनासाठी किंवा अशा इतर संमेलनासाठी अंशदान देता येईल : "परत

कोणतीही पंचायत असा कोणताही स्वागत समारंभ, समारंभ, करमणुकीचा कार्यक्रम किंवा संमेलन यावर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्यशासन वेळोवेळी ठरवून देईल इतक्या रकमेपेक्षा अधिक खर्च करणार नाही आणि पंचायतीच्या वेगवेगळया वर्गाकरिता किंवा प्रवर्गाकरिता त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या संदर्भात वेगवेगळया रकमा ठरविता येतील.]

५) भधारकाच्या हयगयीमुळे किंवा तो व त्याचे कूळ यांच्यामधील वादामुळे त्याच्या शेतीचे अतिशय नुकसान झाले आहे असे पंचायतीला आढळून येईल तर पंचायतीस ही गोष्ट जिल्हाधिकाऱ्याच्य निदर्शनास आणता येईल.

६) पंचायतीने अनुसूचित **जाती** व अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांची स्थिती सुधारण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांच्या बाबतीत आणि विशेषतः अस्पृश्यता निवारण्याच्या कामी, राज्य सरकार, जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी याने यासंबंधात वेळोवेळी दिलेल्या किंवा काढलेल्या निदेशांकचःकंमादेशांचे पालन केले
पाहिजे
६-अ) पंचायत, "त्या गावाच्या शेतकऱ्यांच्या स्वेच्छा संघटनांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करील, आण शेतीच्या उत्पादनात वाढ व सुधारणा करण्यास तेथील सहकारी संस्थांना उत्तेजन देईल.
६-ब) (एकतर महसुली गावांचा कंमाड्यांचा किंवाड्यांचा गट मिळूझालेले असेल असे गाव असणाऱ्या किंवा महसुली गाव किंवा महसुली गावाचा भाग असणारे इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे कोणतेही क्षेत्र असणाऱ्या) एखाद्या गावासाठी स्थापन केलेली पंचायत, अशा गावातील कामे व विकासोजना, यांची अशा रीतीने अंमलबलावणी करील की, त्यामुळे असे प्रत्येक महसुली गाव, पाडा, वाडी किंवा क्षेत्र किंवा त्याचा भाग, यांमध्ये व्यवहार्य असेल तेथवर, असे महसुली गाव किंमाडा, वाडी किंवा क्षेत्र यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, अशा कामांवर व विकास्रोजनांवर, ग्रामनिधीतून खर्च करण्यात येईल.]

६-क) पंचायतीने तिच्या अधिकारितेत असलेल्या क्षेत्रातील प्राथमिक शाळांवर देखरेख ठेवली पाहिजे.]

६-ड) पंचायत, विकास योजनांवर कोणताही खर्च करण्यासाठी सभेची परवानगी मिळवील.

६-इ) त्या पंचायतीच्या अधिकारितेत येणारी कोणतीही जमीन, शासकीय प्रयोजनार्थ, संबंधितमूसंपादन प्राधिकरणाकडून संपादित केली जाण्यापूर्वी ते प्राधिकरण, पंचायतीशी विचारविमर्श करीलः

परत प्रत्येक पंचायत संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाला आपली मते कळविण्यापूर्वी, ग्रामसभेची मते प्राप्त करील आणविचारावेईल.]

७) पंचायतीने त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तिच्याकडे सोपवण्यात आली असतील अशी इतर कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

८) संस्थेची व्यवस्था किंवा कामे पार पाडण्याच्या किंवा ती चालू ठेवण्याच्या जबाबदारीचे हस्तांतरण करण्याचे परिषदांचे व समित्यांचे अधिकार). 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत

समित्या अधिनियम, १९६१, कलम १२४, पोट-कलम (२) आिण पोट-कलम (३) च्या उपबंधांना बाध येऊ न देता, जिल्हा परिषदेस किंवा पंचायत समितीस पंचायतीच्या संमतीने, कोणत्याही वेळी, कोणत्याही संस्थेची व्यवस्था किंवा कोणतेही काम पार पाडण्याची किंवा ते चालू ठेवण्याची जबाबदारी अशा पंचायतीकडे हस्तांतरित करता येईल आणि त्यानंतर अशा पंचायतीने अशा संस्थेची व्यवस्था किंवा असे काम पार पाडण्याची किंवा ते चालू ठेवण्याची जबाबदारी हाती घेणे विधसंमासेल :)

परत अशा प्रत्येक बाबतीत, अशा व्यवस्थेसाठी असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते चालू ठेवण्यासाठी] आवश्यक तेवढी रक्कम जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने] पंचायतीच्या स्वाधीन केली
पाहिजे.

९) इतर कामांची अंमलबजावणी हस्तांतरित करण्याचे राज्य सरकारचे अधिकार.-

राज्य सरकारला, पंचायतीच्या संमतीने, कोणत्याही वेळी, ग्रामीण जनतेच्या कल्याणाची प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वाढ करणाऱ्या कोणत्याही कामाची अंमलबजावणी अशा पंचायतीकडे हस्तांतरित करता येईल आणि त्यानंतर अशा पंचायतीने अशी अंमलबजावणी हाती घेणे विधिसंमत असेल :

परत अशा प्रत्येक बाबतीत, अशा अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेला निधी राज्य सरकारने पंचायतीच्या स्वाधीन केला पाहिजे

१०) इतर कर्तव्ये. संबंधित पंचायतीच्या संमतीने राज्य सरकार ज्या अटी लादील अशा

अटींच्या अधीन, पंचायतीने राज्य सरकार, पंचायत सिमतीशी] विचारविनिमय केल्यानंतर, कालव्याच्या पाण्याच्या वाटपासह जी प्रशासकीय कर्तव्ये शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पंचाययतीकडे सोपवील अशी अन्य प्रशासकीय कर्तव्ये पार पाडली
पाहिजेत.
निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारीकार्यपध्दती पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रांसह इतर बाबींवर दैनंदीन कामकाज व्यतिरिक्त निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीच्या सभेस आहेत. ग्रामपंचायतीच्या सभेस बहुमताने मंजुर झालेल्या ठरावांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीकडुनकरण्यात येते. त्यावर ग्रामपंचायत कार्यकारिणी देखरेखकरते. पर्यवेक्षण मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्या अधिनिस्त अधिकारी यांचे असते. त्यांच्या अधिनिस्त असलेल्या अधिका-यांमार्फत उत्तरदायित्व निश्चित केले जाते.

अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्य...

| **पद** | अधिकार व कर्तव्य |
| --- | --- |
| ग्रामपंचायत  अधिकारी | *महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व लेखासंहिता २०११ नुसारकामकाजकरणे.<br>*मासिक व ग्रामसभेचे सचिव म्हणुनकाम पाहणे.<br>*जन्म,मृत्यु,विवाह नोंदणी निबंधक म्हणुनकाम पाहणे. *जनमाहीती अधिकारी म्हणुनकाम पाहणे.<br>* अर्थसंकल्प तयारकरणे. |
| लिपिक | *कर्मचारी संवर्गावर सोपवलेली कामे करुन घेणे. *कर वसुली करणे.<br>* ग्रामपंचायतचे लेखेतयारकरणे.<br>*सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडणे.<br>*ग्रामपंचायत लेखेसुस्थितीत ठेवणे. |
| संगणक परिचालक | *कर वसुली करणे.<br>* ग्रामपंचायतचे लेखेतयारकरणे.<br>* सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडणे. *ग्रामपंचायत लेखेसुस्थितीत ठेवणे.<br>* सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडणे. |
| शिपाई | *कार्यालयीन व्यवस्था सुस्थितीत राखणे.<br>* ग्रामपंचायत लेखेसुस्थितीत ठेवणे.<br>* ग्रामपंचायत लेखे हाताळणे.<br>* सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडणे. |
| पाणी पुरवठा कर्मचारी पाणी पुरवठा | * सार्वजनिक पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती करणे. * सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सोपवलेली जबाबदारी पार पाडणे. |

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. ३

निर्णय घेण्याची कार्यपध्दती. पर्यवेक्षण व उत्तरदायित्व...

*ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रांसह इतर बाबी व्यतिरिक्त निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीच्या सभेस आहेत.

* ग्रामपंचायतीच्या सभेत बहुमताने मंजुर झालेल्या ठरावांची अंमलबजावणी ग्रामपंचायती कडुन करण्यात येते.

*त्यावर ग्रामपंचायत कार्यकारिणी देखरेख करते.

*पर्यवेक्षण मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्या अधिनिस्त अधिकारी यांचे असते. त्यांच्या अधिनिस्त असलेल्या अधिका-यांमार्फत उत्तरदायित्व निश्चित केले जाते.

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

कार्य **पार** पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके...

| अ. क्र. | नाव | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | जन्म नोंद दाखला | ७ दिवस |
| २ | मृत्यु दाखला | ७ दिवस |
| ३ | विवाह नोंद दाखला | ७ दिवस |
| ४ | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस |
| ५ | येणेबाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस |
| ६ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस |

**ग्रामपंचायत सोरतापवाडी**

**ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२**

**मुद्दाक्र. ५**

कार्य **पार** पाडण्यासाठी वापरण्यात येणारे नियम, विनियम, सुचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख

१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ -

२) जन्म, मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९

३) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११

४) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८

५) शासनाकडुन आलेले विविध परिपत्रके व शासन निर्णय

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली,

जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. ६

दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण

*सोबत अनुसुची जोडले आहे.

ग्रामपंचात सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. ७

धोरण तयार करण्यासाठी किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात व लोकांशी विचार विनियमन करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेली व्यवस्था...

१) अर्ज

२) मासिक सभा

३) ग्रामसभा

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे, ४१२२०२

मुद्दाक्र. ८

सल्ला देण्यासाठी गठित केलेल्या समित्या ...

| अ. क्र. | समितीचे नाव |
|---|---|
| १ | जैविविवधता सिमती |
| २ | महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती |
| ३ | ग्रामदक्षता समिती |
| ४ | कृषी विकास समिती |
| ५ | ग्रामबाल संरक्षण समिती |
| ६ | महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना |
| ७ | देखरेख व दक्षता समिती |
| ८ | ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समिती |
| ९ | पर्यावरण संवर्धन व संरक्षण समिती |
| १० | संविधान सभागृह व बांधकाम समिती |
| ११ | ग्रामस्तरीय समिती |

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, **जि**. पुणे ४१२२०२

मुद्दा क्र. **०९**

**कर्मचारी निर्दर्शिका**

| अ. क्र. | ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे नाव | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १ | श्री.अविनाश गजानन मेमाणे | वरिष्ठ लिपिक |
| २ | श्री.प्रसाद संजय ठाकर | लिपिक |
| ३ | श्री.दिलीप लक्ष्मण चौधरी | वसुली लिपिक |
| ४ | श्री.अशोक दशरथ शेलार | शिपाई |
| ५ | श्री.बाळू सुरेश सावंत | पाणी पु.कर्मचारी |
| ६ | श्रीम.सुमन काळूराम चौधरी | सफाई कामगार |
| ७ | श्री.गंगाराम भास्कर थोरात | घंटागाडी ड्रायव्हर |
| ८ | श्री.महादेव रामा मोरे | घंटागाडी ड्रायव्हर |
| ९ | श्री.जयसिंग गजेंद्र वायभासे | वायरमन |

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, **जि**. पुणे ४१२२०२

मुद्दा क्र. **१०**

**कर्मचारी वेतन**

| अ. क्र. | ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे नाव | धारण केलेले पद | मुळ वेतन |
|---|---|---|---|
| १ | श्री.अविनाश गजानन मेमाणे | वरिष्ठ लिपिक | २८५४९/- |
| २ | श्री.प्रसाद संजय ठाकर | लिपिक | २३९१०/- |
| ३ | श्री.दिलीप लक्ष्मण चौधरी | वसुली लिपिक | २४५१८/- |
| ४ | श्री.अशोक दशरथ शेलार | शिपाई | २४५१८/- |
| ५ | श्री.बाळू सुरेश सावंत | पाणी पु.कर्मचारी | |
| ६ | श्रीम.सुमन काळूराम चौधरी | सफाई कामगार | १२४१०/- |
| ७ | श्री.गंगाराम भास्कर थोरात | घंटागाडी ड्रायव्हर | १३०००/- |
| ८ | श्री.महादेव रामा मोरे | घंटागाडी ड्रायव्हर | १२०००/- |
| ९ | श्री.जयसिंग गर्जेंद्र वायभासे | वायरमन | १४०००/- |

ग्रामपंचायत सोरतापवाडी ता. हवेली,

जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. **११**

योजनांचा तपशिल व प्रस्तावीत खर्च दर्शविणारा प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प व तरतुद केलेल्या रक्कमांचा अहवाल**...**

* सोबत अनुसुची जोडले आहे.

ग्रामपंचायत सोरतापवाडी ता. हवेली,

जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. **१२**

ग्रामपंचायत सोरतापवाडी मधून वैयक्तिक योजनांचा लाभ दिल्याची यादी सन २०२४-२०२५

ग्रामपंचायत सोरतापवाडी ता. हवेली,

जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. **१३**

# सवलती,परवाने,प्राधिकार यांचा तपशिल

| सैनिक मालमत्ता कर सवलत धारक यादी | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | नाव | मासिक सभा दिनांक | मिळकत नंबर |
| १ | विजय संपत चौधरी | २६/१२/२०१७ | १६३२ |
| | | | |
| | | | |

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. १४

इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीचा तपशिल....

* सर्व अभिलेखे हस्तलिखित स्वरुपात उपलब्ध आहेत.

ग्रामपंचायत **सोरतापवाडी**

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०७

मुद्दाक्र. १५

माहिती मिळविण्यासाठी असलेल्या सुविधांचा तपशिल व ग्रंथालय

१) या कार्यालयात उपलब्ध अभिलेखे तपासण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विविध प्रक्रियेनुसारअर्ज केल्यास अर्जदारासमाहिती उपलब्ध करुन देण्यात येते.

२) किरकोळ व मौखिक माहिती लिपिक अथवा ग्रामपंचायत अधिकारी यांचेकडे चौकशी केल्यास मिळु शकते.

३) इतरबाबतीत ग्रामपंचायतकडे अर्ज केल्यास अर्जाची बाब तपासुन मासिक सभेनंतर माहिती देण्यात येते.

४) ग्रामपंचायतमध्ये ग्रंथालय उपलब्ध आहे.

**ग्रामपंचायत** सोरतापवाडी

ता. हवेली,

जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. १६

जनमाहिती अधिकारी नाव, पद

१) जनमाहिती अधिकारी नाव श्री. नंदकुमार पांडुरंग चव्हाण

२) पद - ग्रामपंचायत अधिकारी

३) ग्रामपंचायत सोरतापवाडी ता.हवेली, जि.पुणे

ग्रामपंचायत सोरतापवाडी

ता. हवेली, जि. पुणे ४१२२०२

मुद्दाक्र. १७

इतर माहिती

* अपिलिय अधिकारी जे. बी. बेनके ( विस्तार अधिकारी पं. स. हवेली)